ज्ञानवर्धिनी संस्थेचे

# सोनुभाऊ बसवंत कला आणि वाणिज्य महाविद्यालय, शहापूर

## महिला विकास कक्ष

---

# Training program on 'She Can Defend'

## अहवाल

मंगळवार, दि. ११ ऑगस्ट २०२६ रोजी महाविद्यालयाच्या अंतर्गत गुणवत्ता निर्धारण कक्ष, महिला विकास कक्ष आणि क्रिडा व शारीरिक शिक्षण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने '**Training Program on 'She Can Defend**' या विषयावर प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. महाविद्यालयातील विद्यार्थिनी व महिला प्राध्यापक व महिला शिक्षकेत्तर कर्मचारी यांना धोकादायक परिस्थिती ओळखून योग्य निर्णय घेण्यास सक्षम बनवणे, संकटाच्या वेळी घाबरून न जाता धैर्याने परिस्थितीचा सामना करण्याचे प्रशिक्षण देणे आणि दैनंदिन जीवनातील संभाव्य धोके, छेडछाड व हिंसाचाराच्या प्रसंगी स्व-संरक्षणाच्या योग्य तंत्रांचा वापर करण्याचे मार्गदर्शन करणे हि सदर प्रशिक्षण कार्यक्रमाची उद्दिष्ट्ये होती. या कार्यशाळेस प्रमुख प्रशिक्षक म्हणून महाविद्यालायची माजी विद्यार्थिनी सौ. माधुरी तारमळे या उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाच्या अर्थशास्त्र व वाणिज्य विभागातील सहयोगी प्राध्यापक डॉ. एस. एस. बुधवंत यांनी भूषविले. या कार्यक्रमास महाविद्यालयाच्या क्रिडा व शारीरिक शिक्षण विभागाचे प्रमुख प्रा. एस्. तडवी व क्रिडा प्रशिक्षक श्री. आकाश डोंगरे हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक महिला विकास कक्षाच्या समन्वयक डॉ. सीमा परटोले यांनी केले.

प्रशिक्षक सौ. माधुरी तारमळे यांनी विद्यार्थिनी, महिला प्राध्यापक व महिला शिक्षकेत्तर कर्मचारी यांना संरक्षणाचे महत्त्व व गरज, संभाव्य धोके, संशयास्पद वर्तन आणि असुरक्षित परिस्थिती ओळखण्याचे प्रशिक्षण, आत्मविश्वास व मानसिक तयारी, संकटाच्या वेळी घाबरून न जाता धैर्याने परिस्थितीचा सामना करणे, मूलभूत स्व-संरक्षण तंत्रे, हात-पायांचा प्रभावी वापर, हल्ल्याच्या वेळी बचावाच्या पद्धती, आपत्कालीन परिस्थितीत त्वरित निर्णय घेणे, आपत्कालीन मदत मिळविण्याचे मार्ग, दैनंदिन जीवनातील सुरक्षितता, शारीरिक तंदुरुस्ती व चपळता आणि स्व-संरक्षणाचा प्रत्यक्ष सराव याबाबत मार्गदर्शन केले.

सदर प्रशिक्षण कार्यक्रमात महाविद्यालयातील विद्यार्थिनी आणि महिला प्राध्यापक व महिला शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. स्मिता भोये यांनी केले व आभार प्रदर्शन प्रा. स्वाती फर्डे यांनी केले. सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एल. गायकवाड, उपप्राचार्य प्रो. डॉ. जी.जी. सोनवणे, अंतर्गत गुणवत्ता निर्धारण कक्षाचे समन्वयक प्रो. डॉ. एस. एस. वाघमोडे, महिला विकास कक्षाच्या समन्वयक डॉ. सीमा परटोले, क्रिडा व शारीरिक शिक्षण विभाग प्रमुख प्रा. एस्. तडवी, महिला विकास कक्षाच्या सदस्या प्रा. अर्चना घनघाव, डॉ. अश्विनी ओव्हाळ, प्रा. निशिगंधा जगे, प्रा. सरला कातकाडे, प्रा. यास्मिन शेख, प्रा. स्वाती जाधव, प्रा. स्वाती फर्डे व क्रिडा प्रशिक्षक श्री. आकाश डोंगरे, तसेच महाविद्यालयातील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी विशेष सहकार्य केले.